**जा.क्र./**OW.No.358**/पोउआ/प्रकटीकरण** /2018
**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.**
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
**दूरध्वनी क्र.** /Tel. No. 2262 1220
**दिनांक**/Date : 27/02/2018

प्रति,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
वेब डेव्हलपमेंट सेंटर,
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई

विषय :– 'Best Detection of the Month January - 2018' उत्कृष्ट गुन्हेशोध संकेतस्थळावर ठेवणेबाबत....

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई याचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयातील अधिकारी, अंमलदाराना बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध पुरस्कार पारीत करण्यात येतो. माहे जानेवारी – २०१८ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ, MRA मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी उघडकिस आणलेला सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे गुरक्र. १२६/२००६ कलम ३०२, २०१ भादंवि. या गुन्हयास देण्यात आलेले आहे.

सदर उत्कृष्ट गुन्हे शोधाची (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) माहिती सोबत जोडण्यात आली असून संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.

**सही/–**
**( दिलीप सावंत )**
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि.,मुंबई.

# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जानेवारी २०१८

## MRA मार्ग पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | सर जे.जे.मार्ग पो. ठाणे गुरक्र.१२६/२००६ कलम ३०२,२०१ भादंवि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १४/०५/२००६ रोजी ०८.२५ वा.चे पुर्वी |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | मस्तान तलाव क्रॉस रोडवर, म्युनिसिपल उर्दु सेंट्रल स्कुल समोर, मस्तान तलाव, नागपाडा, मुंबई–०८ |
| ४ | **फिर्यादी** | श्री. निलेश जयसिंग साळुंखे, वय ३१ वर्षे, व्यवसाय–नोकरी, (पोशि. ९८०२०७)/डोंगरी विभाग, राठी – बुध्दनाथ महादेव मंदिर कंम्पाउंड, खोली क्रमांक ३, रायगड सहकारी बॅकेसमोर, इमारत क्रमांक २०च्या शेजारी, जिजामाता नगर, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई. |
| ५ | **बळीत** | किशन विरचंद खारवा, वय अंदाजे ५७ वर्षे, |
| ६ | **आरोपी अटक** | १) फिरासत अली अल्लारखॉ शाह वय ४८ वर्षे,<br>२) इरशाद अली अल्लारखॉ शाह वय ४३ वर्षे,<br>महिला आरोपी ३) बंन्सी किशन खारवा वय ६० वर्षे<br>**अटक दिनांक** १०/०१/२०१८ रोजी |

सर जे.जे.मार्ग पो. ठाणे गुरक्र.१२६/२००६ कलम ३०२,२०१ भादंवि. या गुन्हयात दिनांक १४/०५/२००६ रोजी ०८.२५ वा.चे पुर्वी मस्तान तलाव क्रॉस रोडवर, म्युनिसिपल उर्दु सेंट्रल स्कुल समोर, मस्तान तलाव, नागपाडा, मुंबई–०८ याठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने धारदार हत्याराने एका अनोळखी इसमाचे शिर, दोन्ही हात व दोन्ही पाय कापुन खुन केला व सदरचे मुंडके, दोन्ही हात, दोन्ही पाय गायब करून पूरावा नष्ट केला म्हणुन दिनांक १४/०५/२००६ रोजी सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर बाबत उपरोक्त प्रमाणे सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी अपमृत्यु क्र. १२६/०६ अन्वये नोंद घेवून पो.ना.क्र.९८०२०७/निलेश साळुंखे यांनी सरकारतर्फे फिर्यादी दिलेवरून नमुद प्रमाणे गुन्हा दाखल केला. गुन्हयाचे तपासामध्ये सदर अनोळखी मयत इसमाचे व गुन्हयातील आरोपीचे नाव निष्पन्न न झाल्याने तसेच सदर गुन्हयात आरोपी न मिळाल्याने नमुद गुन्हयाचा तपास तात्पुरता बंद करण्यात आला होता.

एमआरए मार्ग पोलीस ठाण्याचे अधिकारी यांना खास बातमीदारामार्फत अशी खात्रीलायक गोपनिय माहिती मिळाली की, '' दोन टाकी, चिंधी गल्ली येथे जुन्या कपडयाचा धंदा करत असलेले फिरासतअली शाह व त्याचा भाऊ इर्शाद यांनी एका इसमाची मान कापून मानेपासून डोके वेगळे केले तसेच हात–पाय कापून बाजूला करुन त्याचा खुन केला. त्यानंतर त्याच्या हातापायाची व डोक्याची विल्हेवाट लावून नमूद इसमाचे फक्त धड त्यांनी सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे हद्दीत ११–१२ वर्षापूर्वी टाकले होते. तसेच फिरासतअली शाह व त्याचा भाऊ इर्शाद यांना दोघांना बंन्सी नावाच्या महिलेने तिच्या पतीचा खुन करण्याची सुपारी दिली असल्याचीही माहिती प्राप्त झाली.

सदर पथकाने नमुद खात्रीलायक गोपनिय माहिती वरिष्ठांना देवुन गुन्हे अभिलेख तपासला असता, प्राप्त माहितीप्रमाणे सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गुरक्र.१२६/२००६ कलम ३०२,२०१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली. एमआरए मार्ग पोलीस ठाण्याचे पथकाने सदर गुन्हयाचे मुळ कागदपत्र सर जे. जे मार्ग पोलीस ठाणे येथुन ताब्यात घेवून कागदपत्रांचे अवलोकन केले.

सदर पथकास प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने एमआरए मार्ग पोलीस ठाण्याचे दोन विशेष पथके तयार करण्यात आली. सदर पथकांनी सातत्याने ८ दिवस नियमित पहाटे ४ ते सकाळी ९ वाजेपर्यंत चिंधी गल्ली, दोन टाकी, मौलाना शौकत अली रोड, मुंबई येथे साध्या वेशात जावुन सदर दोन्ही आरोपींचे शोधाकरीता निगराणी ठेवण्यात आली. त्याचप्रमाणे सदर पथकास नमुद खुनाची सुपारी देणारी महिला आरोपी ही कामाठीपुरा, बीआयटी चाळ, मुंबई सेंट्रल, रूसी मेहता चौक, जयराज गल्ली, अरब गल्ली, नागपाडा या विभागात कोठे तरी रहाते अशी जुजबी माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे सदर पथकाने नमुद महिलेचा संपुर्ण परिसरात कसुन शोध घेतला. दोन ते तीन दिवसाच्या अथक परिश्रमानंतर सदर महिला सिंधु सागर हौसिंग सोसायटी, बी ब्लॉक, पहिला माळा,रूम नंबर १०२, नवजिवन पोष्ट ऑफीस समोर, के.के मार्ग मुंबई ०८ येथे रहात असल्याची माहिती प्राप्त झाली. प्राप्त माहितीच्या आधारे एमआरए मार्ग पोलीस ठाण्याचे वेगवेगळी पथके तयार करुन चिंदी गल्ली, दोन टाकी, मौलाना

शौकत अली रोड, मुंबई येथे जावुन आरोपी क्र. १) फिरासत अली अल्लारखॉ शाह वय ४८ वर्षे, व २) इरशाद अली अल्लारखॉ शाह वय ४३ वर्षे तसेच महिला आरोपी नामे ३) बंन्सी किशन खारवा वय ६० वर्षे यांचे घरी एकाच वेळी जावून कोणासही खबर न लागता त्यांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

सदर पथकाने महिला आरोपी श्रीमती बन्सीबेन किसन खारवा वय ६० वर्षे हिस विश्वासात घेवुन तिचेकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता तिचे पती किसन विरचंद खारवा हे तिला व तिचे कुटुबियांना मदय प्राशन करुन मारहाण करीत असे. आपल्या पतीच्या त्रासाला कंटाळुन तिने आरोपी क्र. १) फिरासत अली अल्लारखॉ शाह वय ४८ वर्षे, व २) इरशाद अली अल्लारखॉ शाह वय ४३ वर्षे यांना रुपये २ लाखाची सुपारी देवुन संगनमताने सदरचा गुन्हा केल्याची स्पष्ट कबुली दिली. तसेच तिने नागपाडा पोलीस ठाणे येथे दिनांक १४/१२/२००६ रोजी तिचा पती हरविलेबाबत अेएमआर क्र.८७/०६ अन्वये तक्रार नोंद केल्याचीही माहिती दिली.

सदर पथकाने अन्य दोन्ही आरोपीतांकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने तसेच इतर गुन्हयांबाबत अधिक कौशल्यपूर्वक तपास केला असता आरोपी क्र.१) फिरासत अली अल्लारखॉ शाह वय ४८ वर्षे यांच्याविरुध्द राजोरी गार्डन पोलीस ठाणे, दिल्ली येथे गु.र.क्र. ८५६/१९९६ कलम ४५२, ३०२, ३०७,३२४,३४ भादवि हा गुन्हा नोंद असून त्यास मा. सत्र न्यायालय, दिल्ली यांनी नमुद गुन्हयात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती अशी माहिती मिळाली. तसेच तो नमूद गुन्हयात तिहार जेलमध्ये सुमारे ०५ वर्षे सजा भोगत होता. मा. सत्र न्यायालय, दिल्ली यांनी दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे अपील अर्ज केला होता परंतु सदरचे अपील मा उच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १२/०५/२०१६ रोजी नाकारले असून नमूद आरोपीला ४ आठवडयामध्ये तिहार कारागृह, दिल्ली येथे हजर राहण्याबाबत आदेशीत केले होते परंतु सदरचा आरोपी अद्यापपर्यंत कारागृहात हजर राहिला नव्हता. सदर पथकाने डेप्युटी सुप्रिटेंन्डट, सेंट्रल जेल नंबर २, तिहार, दिल्ली यांना आरोपी बाबत माहिती कळविली आहे.

सदर पथकाने आ. क्र. १) फिरासत अली अल्लारखॉ शाह वय ४८ वर्षे, २) इरशाद अली अल्लारखॉ शाह वय ४३ वर्षे तसेच महिला आरोपी नामे ३) बंन्सी किशन खारवा वय ६० वर्षे यांना दिनांक १०/०१/२०१८ रोजी नमुद गुन्हयात रितसर अटक करुन गुन्हयाचे पुढील तपासकामी गुन्हयाच्या मूळ कागदपत्रांसह सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांच्या ताब्यात दिले. सदर पथकाने कोणताही पुरावा अथवा साक्षीदार नसताना मानवी कौशल्याचे आधारे फिर्यादींचे कुटुंबियास होणाऱ्या मारहाणीस कंटाळून २ लाख रुपये सुपारी देवुन व इतर आरोपींबरोबर संगनमत करुन धारदार हत्याराने मयत इसमाचे शिर, दोन्ही हात व दोन्ही पाय कापुन ते इतरत्र फेकुन फक्त शरीराचे धड फेकुन देणाऱ्या सराईत गुन्हेगारांना खुनाची सुपारी देणारी मयताचे पत्नीसह अटक करून **सदरचा खुनाचा गंभीर गुन्हा तब्बल १२ वर्षांनी उघडकिस आणला आहे.**

**टिपः— ( सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे अटक आरोपीतांनी गुन्हयाबाबत कोणतीही माहिती दिली नाही. गुन्हयातील मयत इसमाची ओळख अद्याप पटलेली नसुन, त्याची बॉडी DNA तपासणीकरीता पाठविली असुन, DNA अहवाल प्राप्त होणे बाकी आहे. अटक आरोपीतांकडे वारंवार कसुन चौकशी करता, त्यांनी गुन्हयाबाबत अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही. )**

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना जानेवारी—२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**MRA मार्ग पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुखलाल आनंदा वर्पे | ७ | पोहक्र.२४२२१/विनोद निवृत्ती कांबळे |
| २ | पोलीस निरीक्षक गुलाबराव अर्जुन मोरे | ८ | पोनाक्र.३३४८३/विलास कृष्णा खाडये |
| ३ | पोलीस निरीक्षक रागीनी महादेव भागवत | ९ | पोशिक्र.०३.२३१/संदीप वसंत करभाल |
| ४ | सहा.पोलीस निरीक्षक संदीप शिवाजी सांवत | १० | पोशिक्र.०३.९१६/शेखर शिवराम भंडारी |
| ५ | पोलीस उपनिरीक्षक रविंद्र हरिभाऊ पाटील | ११ | पोशिक्र.०८.०४४९/रणजीत सुदाम जाधव |
| ६ | पोलीस उपनिरीक्षक किरण हिंदुराव पाटील | १२ | मपोशिक्र.०३.२२५/कविता नवलू चव्हाण |